## विधि व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ ऑगस्ट २०१८

## अधिसूचना

**हिंदू विवाह अधिनियम, १९५५.**

क्रमांक संकीर्ण. २१७/प्र.क्र. ७२/का-११.— हिंदू विवाह अधिनियम, १९५५ (१९५५ चा २५) हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्याच्या कलम ३ च्या खंड (ख) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचनांचा, त्यामध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, दिनांक २६ ऑगस्ट २०१८ पासून जळगाव जिल्ह्यातील चाळीसगावच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये, उक्त अधिनियमान्वये कार्यवाही करण्यासाठीच्या प्रकरणासंदर्भात जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव येथील दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांचे न्यायालय यांना अधिकारिता असल्याचे विनिर्दिष्ट करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. श्या. कलोती,**
शासनाचे सह सचिव.